# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/12/2022 (गुरूवार) सायंकाळ

---

## बनावटी जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपी जेरबंद

## एकुण 7,16,000 रूपयांचा मुद्येमाल जप्त

## पोलीस स्टेशन पारशिवनी यांची कारवाई

दिनांक २७/१२/२०२२ रोजी टाटा योध्दा कंपनीच्या मालवाहु वाहन क्र. MH-44/U-0805 चे चालक नामे भगवान वातुजी कावळे वय ४३ वर्ष रा. अंबाळा वार्ड, रामटेक हा रामटेक येथिल किराणा दुकानदार कशिश परितोष चौकसे वय २७ वर्ष रा. सुभाष वार्ड, रामटेक यांचेकरीता इतवारी, नागपुर येथुन किराणा माल आणण्याकरीता मालवाहु वाहन क्र. MH-44/U-0805 ने रामटेक वरून नागपुरला जात असतांना सकाळी १०:३० वा. दरम्याण डुमरीकला शिवारात निकोला बार & रेस्टॉरेंट चे समोर NH-44 चे वर दोन मो.सा. वरील तिन अनोळखी ईसमांनी डोळ्यात पावडर/भुकटी टाकुन वाहणातील नगदी ४ लाख रूपये चोरून नेले आहे, अशा प्राप्त माहीतीवरून घटनेची शहानिशा करने करीता पोलीस सटेशन पारशिवनी येथिल PSI दिलीप बासोडे, पोहवा./गंगाप्रसाद वरखडे व पोहवा/संदीप कडु यांना घटनास्थळी रवाना करून फिर्यादी कशिश परितोष चौकसे वय २७ वर्ष रा. सुभाष वार्ड, रामटेक यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. ला अप.क्र. ३७८/२२ कलम ३९२, ३४, ५०६ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

तपासा दरम्याण पो.स्टे. तील तपास पथकाचे PSI दिलीप बासोडे, पोहवा./गंगाप्रसाद वरखडे व पोहवा/संदीप कडु यांनी घटनास्थळी भेट देवुन घटनेबाबत शहानिशा केली असता वाहण क्र. MH-44/U-0805 हे घटनास्थळी रोडखाली सुस्थितीत उभे केलेले दिसुन आले, वाहणाचे बाहेरील भागाचे दार, समोरील काच तसेच आतील भागाचे स्टिअरींग, सिट, डॅशबोर्डवर कुठेही पावडर/भुकटीचे अंश मिळुन आले नाही तसेच वाहणात कुठेही जबरदस्ती शिरकाव केल्याच्या खुना आढळुन आल्या नाही यावरून यातील वाहन क्र. MH-44/U-0805 चे चालकाने सांगीतलेली घटना ही संशयास्पद वाटत असल्याने वाहण क्र. MH-44/U-0805 चे चालक भगवान वातुजी कावळे व त्याचा मित्र निलेश सदानंद गिरी वय ३० वर्ष रा. मनसर यांना ताब्यात घेवुन त्यांना घटनेबाबत सखोल विचारपुस केली असता त्यांनी अनोळखी आरोपीतांकडुन त्यास जबरीने लुटल्याची घटना खोटी असल्याचे व त्यांनी स्वत:च स्वत:चे आर्थिक फायद्या करीता पैशांचे लोभापाई फिर्यादीने त्याचेकडे विश्वासाने सोपविलेले ४,००,००० रू. काढुन लपवुन ठेवले असल्याचे सांगीतले.

सदर गुन्हयाचे तपासात पो.नि. राहुल सोनवणे यांचे मार्गदर्शनात PSI दिलीप बासोडे, पोहवा./गंगाप्रसाद वरखडे व पोहवा/संदीप कडु यांनी अतिशय वेगाने तपासचक्र फिरवुन पो.स्टे. ला गुन्हा दाखल झाल्याचे अवघ्या दोन तासात सदरचा गुन्हा उघडकीस आणुन दोन आरोपीतांना अटक करून दोन्ही आरोपीतांचा मा. JMFC पारशिवनी येथुन दोन दिवसांचा PCR प्राप्त केला, आरोपीतांकडुन रोख रक्कम ४,००,००० रूपये, एक टाटा योध्दा वाहन क्र. MH-44/U-0805 किंमती ३,००,००० रू.,दोन मोबाईल फोन किं. १६००० रू. असा एकुण ७,१६,००० रूपयांचा मुद्येमाल जप्त

करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात भादविचे कलम ४०६, ३४, १२०(ब) अन्वये कलमवाढ करण्यात आलेली असुन पुढील तपास PSI दिलीप बासोडे हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. विशाल आनंद (भा.पो.से.)पोलीस अधिक्षक ना.ग्रा., मा. डॉ. संदीप पखाले अपर पोलीस अधिक्षक ना.ग्रा. तसेच मा. अशित कांबळे (भा.पो.से.)सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांचे मागदर्शनात पो.नि. राहुल सोनवणे यांचे नेतृत्वात PSI दिलीप बासोडे, पोहवा. संदीप कडु, पोहवा. /गंगाप्रसाद वरखडे, सफौ./प्रमोद कोठे, पो.अं./महेश फुलझेले तसेच महीला कर्मचारी कविता लोखंडे यांनी केलेला आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर